**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**विषय : अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळ निवडणुका २०१७**
**नामनिर्देशनपत्र भरतांना घ्यावयाची दक्षता**

संदर्भ : अधिसूचना (असाधारण) क्र. १२८/२०१७, दिनांक १२.९.२०१७ (निवडणूक कार्यक्रम)

महोदय / महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम 28(2)(o), (p), (r), (s), (t), 32(3)(g), आणि 40(2)(c) तसेच, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब मध्ये दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचनाचे माध्यमातून दिलेले आदेशाचे अधीन राहून विद्यापीठाच्या विषयांकित प्राधिकारिणींचे गठन निवडणुकीचे माध्यमाने करावयाचे आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे मतदार संघात निवडणुका आयोजीत करण्यात आलेल्या आहेत.

| प्राधिकरणाचे नांव | | मतदार संघ | म.सा.वि.कायदा २०१७ कलम |
|---|---|---|---|
| अ) अधिसभा | - | (१) १० प्राचार्य | 28(2)(o) |
| | | (२) ६ व्यवस्थापनाचे प्रतिनिधी | 28(2)(p) |
| | | (३) १० अध्यापक (प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांच्याखेरीज इतर) | 28(2)(r) |
| | | (४) ३ विद्यापीठ अध्यापक | 28(2)(s) |
| | | (५) १० नोंदणीकृत पदवीधर | 28(2)(t) |
| ब) विद्या परिषद | - | (६) प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधित्व करणारे २ अध्यापक | 32(3)(g) |
| क) अभ्यास मंडळ | - | (७) संलग्न महाविद्यालयांमधील संबंधित विषयाचे ३ विभाग प्रमुख | 40(2)(c) |

संदर्भांकित अधिसूचनेद्वारा निवडणुकीचा कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आला असून सदर कार्यक्रमानुसार नामांकन अर्ज विद्यापीठाला सादर करावयाची **अंतिम तारीख दि. २१.९.२०१७ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत)** निश्चित करण्यात आली आहे. नामांकन अर्ज विद्यापीठाला सादर करतेवेळी वरील क्र. १ ते ७ मतदार संघाकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील **तरतूदीव्यतिरिक्त** शासनाने दिनांक २९.४.२०१७ च्या अधिसूचनेच्या माध्यमातून दिलेल्या आदेशान्वये उमेदवारांकरीता वर्गनिहाय (Categorywise) पात्रता खालील तक्त्यातील स्तंभ क्र. २ मध्ये विहीत केली आहे. त्यानुषंगाने सदरील स्तंभ क्र. ३ नुसार उमेदवाराने धारण केलेल्या पात्रतेचे प्रमाणित दस्तावेज नामांकन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **संबंधित मतदार संघाकरीता नामांकन अर्ज सादर करतांना नामांकन अर्जासोबत स्तंभ क्र. ३ मध्ये त्या त्या मतदारसंघाकरिता निर्देशित केलेले दस्तावेज आणि नामांकन अर्जनिहाय विद्यापीठ खाती विहित केलेले नामांकन शुल्क रू. २००/- (रू. दोनशे फक्त) चा भरणा केलेली (विद्यापीठाकरिता असलेली) पावती अथवा 'कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ' या नावे असलेला धनाकर्ष (Demand Draft) जोडलेला नसल्यास तद्वतच अपूर्ण व चुकीचे नामांकन अर्ज रद्द समजण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**तक्ता**

| अ.क्र. | विहीत पात्रता | नामांकन अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| **A) <u>SENATE</u>** | | |
| **(1)** | **<u>TEN Principals on Senate u/s 28(2)(o)</u>** | |
| | a) Should possess Ph.D.Degree, unless appointed as Principal before 13/10/2000. | – अ) दिनांक १३.१०.२००० पूर्वी प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली नसल्यास आचार्य पदवी प्रमाणपत्राची अथवा विद्यापीठ अधिसूचनेची प्रमाणित प्रत आणि दि. १३.१०.२००० पूर्वी नियुक्ती झाली असल्यास महाविद्यालयीन व्यवस्थापनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.<br>– ब) प्राचार्यांच्या नियुक्तीस विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेची प्रमाणित प्रत. |
| | b) Should be a Principal of a college which has valid Certification of Accreditation by NAAC or NBA as the case may be and | – राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे 'वैध अधिस्वीकृती'चे प्रमाणपत्र आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झालेला नसावा. |

| १. | २. | ३. |
|---|---|---|
| | period of validity of such Certificate is not expired. | |
| | c) Should have undertaken university exam. related work for at least five years in aggregate. | – विद्यापीठ परीक्षांशी संबंधीत कामांचा एकूण किमान ५ वर्षे कालावधीचा पुरावा. |
| **(2)** | **<u>SIX Representatives of Managements on Senate u/s 28(2)(p)</u>** | |
| | a) Should possess Bachelors Degree | – कोणत्याही विद्याशाखेची स्नातक पदवी प्रमाणपत्र धारण केल्याचा पुरावा. (प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडावी.) |
| | b) Should be a member of Governing Body/ Management Committee of the Management for at least two years. | – व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा/व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असल्याचा पुरावा. |
| | c) Should have at least one College or Institution run by such Management having valid certification of Accreditation by NAAC or NBA, as the case may be and period of validity of such Certificate is not expired. | – राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे 'वैध अधिस्वीकृती'चे प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झालेला नसलेल्या अशा किमान एका महाविद्यालयाचे संबंधित व्यवस्थापनाने मानांकन केल्याचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. |
| **(3)** | **<u>TEN Teachers on Senate u/s 28(2)(r)</u>**<br>*(other than Principals and Directors of Recognised Institions)* | |
| | a) Should possess Ph.D. Degree with at least ten years teaching experience in aggregate, <u>OR</u> Should have at least fifteen years teaching experience in aggregate. | – आचार्य पदवी प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीसह किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असल्याबाबतचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र <u>किंवा</u> एकूण पंधरा वर्षे अध्यापनाचा अनुभव असल्याबाबतचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| | b) Should have undertaken university exam. related work for at least five years in aggregate. | – विद्यापीठ परीक्षांशी संबंधीत कामांचा एकूण किमान ५ वर्षे कालावधीचा पुरावा. |
| **(4)** | **<u>THREE University Teachers on Senate u/s 28(2)(s)</u>** | |
| | a) Should possess Ph.D. Degree with at least ten years teaching experience in aggregate. | – आचार्य पदवी प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीसह किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असल्याबाबतचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| | b) Should have undertaken university exam. related work for at least five years in aggregate. | – विद्यापीठ परीक्षांशी संबंधीत कामांचा एकूण किमान ५ वर्षे कालावधीचा पुरावा. |
| **(5)** | **<u>TEN Registered Graduates on Senate u/s 28(2)(t)</u>** | |
| | a) Has graduated atleast five years prior to the date of nomination. Shall not include graduates falling in or covered by the category of Teachers (regular or on contract basis irrespective of their teaching experience), Principals, Heads of the Departments, Management or any other categories mentioned in the Section 28(2). | – नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान <u>पाच वर्षे</u> आधी पदवीधर झालेला असावा. यामध्ये अध्यापक (नियमीत किंवा कंत्राटी तत्त्वावरील अध्यापकांचा- मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या पदवीधरांचा समावेश होणार नाही. याकरीता पदवी प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीसह सोबतचे घोषणापत्र* (Declaration) जोडणे आवश्यक आहे. |

| १. | २. | ३. |
|---|---|---|

**B) <u>ACADEMIC COUNCIL</u>**

**(6) <u>TWO Teachers, representing each faculty on Academic Council u/s 32(3)(g)</u>**

| | | |
|---|---|---|
| a) Should posssess Ph.D. Degree | – | आचार्य पदवी प्रमाणपत्राची अथवा विद्यापीठ अधिसूचनेची प्रमाणित प्रत. |
| b) Should have at least 15 years aggregate teaching experience | – | एकूण किमान १५ वर्षांचा अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र |
| c) Should be a recognised Ph.D. Guide under whose supervision, at least two students have been awarded Ph.D. Degree. | – | मान्यताप्राप्त पीएच.डी.मार्गदर्शक असल्याबाबतचे विद्यापीठ पत्र तसेच त्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केल्याचा पुरावा म्हणून विद्यापीठ अधिसूचनेची प्रमाणित प्रत. |
| d) Should have authored/co-authored at least two text books/reference books <u>or</u> should have published at least three research papers in peer reviewed journals as first/corresponding author. | – | किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असल्याबाबतचा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिद्ध झाले असल्याबाबतचा पुरावा. |
| e) Should have undertaken university exam. related work for at least five years in aggregate. | – | विद्यापीठ परीक्षांशी संबंधीत कामांचा एकूण किमान ५ वर्षे कालावधीचा पुरावा. |

**C) <u>BOARD OF STUDIES</u>**

**(7) <u>THREE Heads of Departments on Board of Studies u/s 40(2)(c)</u>**

| | | |
|---|---|---|
| a) Should possess Ph.D. Degree, unless he is a Principal appointed as a Principal before 13th October, 2000. | – | दिनांक १३.१०.२००० पूर्वी प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली नसल्यास आचार्य पदवी प्रमाणपत्राची अथवा विद्यापीठ अधिसूचनेची प्रमाणित प्रत आणि दि. १३.१०.२००० पूर्वी नियुक्ती झाली असल्यास महाविद्यालयीन व्यवस्थापनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. |
| b) Should have at least ten years teaching experience at under graduate level in aggregate. | – | पदवीपूर्व स्तरावर एकूण किमान दहा वर्षांच्या अध्यापनाचा अनुभव असल्याचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| c) Should have undertaken university exam. related work for at least five years in aggregate. | – | विद्यापीठ परीक्षांशी संबंधीत कामांचा एकूण किमान ५ वर्षे कालावधीचा पुरावा. |

**टिप - नामनिर्देशनपत्र भरतांना घ्यावयाची काळजी :-**

१. वरील प्राधिकरणाच्या संबंधित वर्गवारीतील गटासाठी तयार केलेल्या मतदार यादीतील <u>दोन मतदारांची सूचक व अनुमोदक म्हणून स्वाक्षरी</u> घ्यावी. <u>उमेदवारानेही स्वाक्षरी करणे आवश्यक</u> आहे. जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल.

२. **अभ्यास मंडळावर नामनिर्देशनपत्र सादर करतांना** <u>उमेदवार, सूचक व अनुमोदक हा संबंधीत अभ्यास मंडळातील असणे गरजेचे आहे.</u>

३. नामनिर्देशपत्रावर उल्लेखीत ठिकाणी **दिनांक टाकणे आवश्यक** आहे.

४. आरक्षीत जागेसाठी नामनिर्देशनपत्र सादर करतांना संबंधित वर्गवारीतील असलेल्या <u>जातीचे वैधता प्रमाणपत्र</u> जोडणे आवश्यक आहे.

**नामांकन अर्जासोबत तक्त्यातील स्तंभ क्र. ३ अन्वये त्या त्या मतदार संघाकरिता निर्देशित केलेले दस्तावेज, विहित शुल्क आणि नामांकन अर्ज भरतांना घ्यावयाची काळजी या शिर्षकान्वये विहित केलेल्या माहितीची पूर्तता नामांकन अर्जात आढळून न आल्यास असे नामांकन अर्ज अवैध समजून ते फेटाळल्या जाईल.**

स्वा/-
(डॉ.अजय देशमुख)
कुलसचिव तथा निर्वाचन अधिकारी,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

* घोषणापत्राचा नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# घोषणापत्र (Declaration)

प्रति,
कुलसचिव तथा
निर्वाचन अधिकारी,
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**विषय : अधिसभा निवडणूक - २०१७**
निवडणूक लढविणाऱ्या पंजीकृत पदवीधर उमेदवाराने द्यावयाचे घोषणापत्र.

संदर्भ : १. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ चे कलम 28(2)(t)
२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचनाचे माध्यमातून दिलेले आदेश

महोदय,

मी, ______________________________________________,

दिनांक ____________________ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या पंजीकृत पदवीधर मतदार संघात ________________ या संवर्गातून निवडणुकीसाठीचा उमेदवार असे घोषीत करतो की, मी -

१) नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान पाच वर्षे आधीचा पदवीधर आहे.

२) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अध्यापक (नियमीत किंवा कंत्राटी) किंवा प्राचार्य किंवा विभाग प्रमुख किंवा महाविद्यालयाचे व्यवस्थापन किंवा म.सा.वि. कायदा, २०१६ च्या कलम २८(२) मध्ये अंतर्भूत असणाऱ्या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणारा पदवीधर नाही.

वर दिलेली माहिती खोटी आढळल्यास माझे नामांकन रद्द होऊ शकते याची मला जाणीव आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

ठिकाण :
दिनांक :

स्वाक्षरी -
नांव -
मतदार यादीतील अ.क्र. -